महासागर
मंगळवार दि. 15 जूलै 2025
अमरावती
पान २

# शालेय बाल संसद निवडणूक यशस्वीपणे पार



गोपाळराव वानखडे माध्यमिक विद्यालयाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.14 )** – गोपाळराव वानखेडे माध्यमिक विद्यालय, मोर्शी येथे शालेय बाल संसद निवडणूक मोठ्या उत्साहात व लोकशाही पद्धतीने पार पडली. सदर निवडणुकीसाठी एकूण 13 उमेदवारांसह 'नोटा' पर्यायासह एकूण 14 उमेदवार रिंगणात उभे होते.ही निवडणूक शनिवार, दिनांक 12 जुलै 2025 रोजी घेण्यात आली. यात नववी इयत्तेतील विद्यार्थी कार्तिक विजयराव नेवारे यांनी बहुमताने विजय मिळवून बाल संसदेत स्थान मिळविले. निवडणुकीदरम्यान मतदान प्रक्रियेचे संपूर्ण आयोजन विद्यार्थ्यांच्या सहभागाने पार पडले. निवडणूक प्रक्रियेसाठी वर्ग 10 वीची विद्यार्थिनी कुमारी वेदिका ठाकरे हिने केंद्राध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. तर मतदान अधिकारी म्हणून वर्ग 10 ची विद्यार्थीनी कुमारी श्रावणी परसवाडे , कुमारी श्रुतिका पांडे, अनामिका मेश्राम आणि धनुष्य करोची यांनी जबाबदारी पार पाडली. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे समन्वयक म्हणून शाळेतील शिक्षक प्रशांत मानकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या उपक्रमात पाटील, राऊत, साबळे, तसेच इतर शिक्षकांनी सहकार्य केले आणि खडसे, जाणे व कुरवाडे यांनी सहकार्य केलेत व शाळेचे मुख्याध्यापक लांडे यांनी देखील संपूर्ण प्रक्रियेत मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांचे उत्साहवर्धन केले. निवडून आलेल्या सर्व बाल सांसदांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे.

# कुपोषणग्रस्त जिल्ह्यांतील पोषण आहाराची एफडीएमार्फत तपासणी होणार का?

■ आ. संजय खोडके यांचा सरकारला विधानपरिषदेत थेट सवाल



**महासागर प्रतिनिधी**
**मुंबई/अमरावती,( दि.14 )**– राज्यात कुपोषण निर्मूलनासाठी अनेक सरकारी योजना राबविल्या जात असतानाही, प्रत्यक्षात कुपोषणाची स्थिती जैसे-थे असल्याचे वास्तव अधोरेखित करत आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेच्या पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधले.

महिला व बाल विकास विभागाशी संबंधित लक्षवेधी सूचनेद्वारे आ. खोडके यांनी सांगितले की, राज्यातील 14 कुपोषणग्रस्त तालुक्यांपैकी अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांमध्ये कुपोषणाचे प्रमाण इतर 12 तालुक्यांपेक्षा अधिक म्हणजे दुपटीने वाढलेले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पोषण आहाराच्या गुणवत्तेवर संशय व्यक्त केला.

## एफडीए तपासणीची गरज

आ. खोडके यांनी सभागृहात स्पष्ट प्रश्न उपस्थित केला की, कुपोषणग्रस्त भागांमध्ये अंगणवाडी केंद्रे आणि आरोग्य केंद्रांमार्फत वितरित होणारा पोषण आहार वेळेवर आणि सकस स्वरूपात पोहोचतो का? तसेच, या आहाराच्या गुणवत्तेची अन्न व औषध प्रशासन (एफडीए) मार्फत नियमित तपासणी का केली जात नाही? असा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. आहाराचा दर्जा तपासण्यासाठी एफडीएचा सहभाग अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## एफआरएस प्रणालीची माहिती

यावर उत्तर देताना महिला व बाल विकास मंत्री ना. अदिती तटकरे यांनी सांगितले की, लाभार्थ्यांपर्यंत पोषण आहार पोहोचतो की नाही हे सुनिश्चित करण्यासाठी 'फेस रिकग्निशन सिस्टीम (एफआरएस)' प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सुमारे 73 टक्के काम पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. लाभार्थ्याला आहार मिळाल्यानंतर एफआरएस प्रणालीद्वारे त्याची नोंद केली जाते.




## आकडेवारीत सुधारणा, मात्र परिस्थिती गंभीर

राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार कुपोषणाची तीव्रता काहीशी कमी झाल्याचे दिसते. 'सॅम' (गंभीर तीव्र कुपोषण) गटातील प्रमाण 0.59 टक्के आणि 'मॅम' (मध्यम तीव्र कुपोषण) गटातील प्रमाण 3.05 टक्के असल्याचे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात मातामृत्यू, बालमृत्यू यांचे प्रमाण अजूनही चिंताजनक असून यावर अधिक ठोस उपाययोजना आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

## खोडके यांच्या सूचना लक्षात घेणार

अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा येथे कुपोषणाचा प्रश्न अधिक गंभीर असल्याचे लक्षात घेऊन आमदार खोडके यांनी मांडलेल्या शंका आणि सूचना शासन गांभीर्याने विचारात घेईल, असे आश्वासन मंत्री तटकरे यांनी दिले. त्यांनी सांगितले की, सुधारणेच्या प्रक्रियेत सदस्यांच्या सूचना अंतर्भूत केल्या जातील.

# वझ्झर बालगृह 'मॉडेल' म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न



## जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 14 )**– अचलपूर तालुक्यातील वझ्झर फाटा येथे असलेल्या स्व. अंबादास पंत वैद्य मतिमंद व मूकबधिर बालगृहाला 'वझ्झर मॉडेल' म्हणून घोषित करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असे आश्वासन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.येरेकर यांनी बालगृहाला प्रत्यक्ष भेट देऊन संपूर्ण परिसराची पाहणी केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्याशी विविध मुद्द्यांवर एक तास सविस्तर चर्चा झाली. बालगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांची जाण घेतली. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते लावलेली झाडे आणि परिसरातील स्वच्छता पाहून जिल्हाधिकारी समाधान व्यक्त केले.या चर्चेदरम्यान, डॉ. पापळकर यांनी बालगृहासाठी महत्त्वाचे प्रस्ताव मांडले. यामध्ये बालगृहास 'वझ्झर मॉडेल'चा दर्जा देणे, विद्यार्थ्यांचे मासिक मानधन ?5,000 पर्यंत वाढवणे, काही मुलांना आजीवन बालगृहात ठेवण्याची परवानगी, तसेच विभागीय स्तरावर वझ्झर मॉडेल सुरू करण्याचे मुद्दे सामाविष्ट होते. जिल्हाधिकाऱ्यांनी हे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आश्वासन दिले. या दौऱ्यात जिल्हा समाजकल्याण अधिकारी डी.एम. पुंड व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सोंदळे यांचीही उपस्थिती होती.

# नगरपरिषदेचा मनमानी कारभार पुन्हा चव्हाट्यावर

■ भर पावसात केला डांबरी रस्ता
■ अवघ्या पंधरा दिवसांत उखडला 50 लाखांचा रस्ता





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.14 )**–अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अंतर्गत शहरात मोठ्या प्रमाणात कामे चालू असुन ती कामे मर्जीतील कंत्राटदारांना देण्यात आल्याची ओरड शहरात होत होती. मर्जीतील कंत्राटदार काम करत असताना निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या अनेक तक्रारी होऊन स्थानिक नगरपरिषद प्रशासन कोणत्याही प्रकारची तक्रारींची दखल न घेतल्याचे दिसून येत आहे. शहरातील गेल्या वीस वर्षांपासून स्वप्ननगरी नगरातील नागरिक नगराला चांगला रस्ता मिळावा यासाठी सतत पाठपुरावा करत होते मात्र वीस वर्षांपासून रस्त्याची मागणी करत असताना यावर्षी डांबरी रस्त्याला सुरवात झाली मात्र स्वप्ननगरीत नुकताच पंधरा दिवसांपूर्वी डांबरी रस्ता करण्यात आला असून डांबरी रस्ता भर पावसात केल्यामुळे रस्ता उखडून निघत असून रस्ता दर्जाहीन झाला असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे .तर या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहे. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कंत्राटदार आणि संबंधित नगरपरिषदच्या कामाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या रस्त्यावरून कोणतीही जड वाहतूक जात नसताना पंधरा दिवसांत या रस्त्यांची दुरवस्था झाली असून हा रस्ता जागोजागी उखडला असल्याने नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्यांची पाहणी करून रस्त्यांचा दर्जा तपासावा अशी मागणी स्वप्ननगरी नगरातील रहिवाशांकडून होत आहे. पावसाळ्यात डांबरी रस्ता करणे योग्य नाही. पावसाळ्यात डांबरीकरण केल्यास, डांबर व्यवस्थित पसरत नाही आणि रस्त्याची गुणवत्ता कमी होते. तसेच, पावसाचे पाणी डांबरात मुरल्यास,डांबराची गुणवत्ता कमी होऊन रस्त्यावर खड्डे लवकर पडतात आणि रस्ता कमकुवत होऊन खराब होतो.

## वीस वर्षांपासून रस्त्याची मागणी

स्वप्ननगरीतील रहिवाशांनी रस्त्यासाठी वीस वर्षे संघर्ष केला असुन वीस वर्षांनंतर या रस्त्यांला डांबरी रस्ता मिळाला होता मात्र भर पावसात डांबरी रस्ता केल्याने चारच दिवसांनी रस्त्यावरचे डांबर निघून शासनाच्या 50 लाखाचा कंत्राटदार व अभियंता यांच्या मनमानी पद्धतीने चुराडा झाला असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे .

आमच्या नगरात अत्यंत निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करण्यात आले आहे. कंत्राटदाराने रस्त्यांची व्यवस्थित साफसफाई न करता डांबरीकरण करण्यात आले तसेच पाऊस चालू असताना डांबरीकरण करण्यात आल्यामुळे रस्ता दर्जाहीन झाला आहे. आम्ही जिल्हाधिकारी यांच्या कडे कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करुन रस्ता पुन्हा करण्याची विनंती करणार आहे
**–स्वप्नील तायडे,** स्वप्ननगरी रहिवासी.

# फुटपाथवरील अतिक्रमणावर मनपाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )**– महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने बडनेरा झोन क्रमांक 4 अंतर्गत नवाथे प्लॉट ते साईनगर परिसरातील फुटपाथवरील अनधिकृत अतिक्रमणावर मोठी कारवाई केली. या मोहिमेत हातगाड्या, लोखंडी पानठेले, चायनीज खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे स्टॉल्स, फळ विक्रेते आदींच्या सुमारे दोन ट्रक भर साहित्य जप्त करण्यात आले.

ही कारवाई 10 जुलै रोजी सकाळी 10.30 वाजता महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार करण्यात आली. अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राजापेठ पोलीस स्टेशनच्या सहकार्याने कारवाई पार पडली. सदर ठिकाणी अनेक हातगाड्या व स्टॉल्स हे कायमस्वरूपी थाटून व्यवसाय चालवत होते. यामुळे नागरिकांना पादचारी मार्गाने चालणे कठीण झाले होते. यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मनपाने ही कारवाई हाती घेतली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अतिक्रमण काढल्यानंतर संबंधित विक्रेत्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला की, पुन्हा अतिक्रमण आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. महानगरपालिकेने नागरिकांना अपील केले की, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये. पादचाऱ्यांचा हक्काचा मार्ग मोकळा ठेवावा, अन्यथा अशा कारवाया भविष्यातही सुरू राहतील, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## दोन ट्रक साहित्य जप्त



# अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर होताच आरोपी फरार

## पोलिसांकडून शोध सुरू

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.14 )**–मित्राला चाकू मारून गंभीर जखमी केल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्यानंतर तो फरार झाला असून, वरुड पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचे नाव बाबा उर्फ सोफियान शाह निसार शाह (वय 30, रा. नया डायरा, वरुड, शहापूर) असे आहे. त्याने आकाश बबनराव कुंभारे (वय 26, रा. ताज नगर, वरुड) व त्याच्या मित्रावर चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. याबाबत आकाश कुंभारे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे वरुड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता. आरोपीने अटक टाळण्यासाठी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेता न्यायालयाने त्याचा अर्ज नामंजूर केला. जामीन अर्ज नामंजूर होताच आरोपी फरार झाला असून, वरुड पोलीस ठाण्याचे ठाणेदार अर्जुन ठोसरे व पोलीस हेड कॉन्स्टेबल मनोज टप्पे यांच्या नेतृत्वात पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली आहे.



पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, जर कोणाला आरोपीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास ती तात्काळ वरुड पोलीस स्टेशनला कळवावी, जेणेकरून पुढील कायदेशीर कारवाई करता येईल. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथक स्थापन करण्यात आली असून, लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलीस विभागाने व्यक्त केला आहे.




# महात्मा फुले महाविद्यालयात प्रभातफेरी व शपथविधी

## 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.14 )**– येथील महात्मा फुले, कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) आणि क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत जनजागृती प्रभातफेरी आणि शपथविधीचे भव्य आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्हि. हांडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देऊन झाली. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. निलेश ठाकरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प देत शपथ दिली. शपथविधीनंतर प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. वरूड शहरातील मुख्य रस्त्यांवरून निघालेल्या प्रभातफेरीमध्ये विद्यार्थ्यांनी 'नशा के विरुद्ध आवाज उठाओ', 'व्यसनमुक्त जीवन - सुंदर जीवन', 'आज का संकल्प ङ्क नशा मुक्त भारत' अशा जोरदार घोषणा देत व्यसनमुक्तीचा संदेश समाजात पोहोचवला. फलक, बॅनर आणि घोषणांमधून जनजागृतीचे प्रभावी चित्र पाहायला मिळाले. या उपक्रमात महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक आणि शिक्षकवृंद, प्रा. यू. बी. सांगोळकर, डॉ. एम. बी. बोबडे, प्रा. सतीश कोलटेके, प्रा. आम्रपाली पाटील, डॉ. प्रियंका बेलसरे, डॉ. नरेश सरकार, डॉ. नलिनी बोडके, डॉ. डी. बी. वानखेडे, प्रा. लक्ष्मण पवार, अतिक शेख तसेच अनेक मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. विलास हिरणवाळे,एनसीसी अधिकारी प्रा. वैभव गुल्हाने आणि क्रीडा विभाग प्रमुख प्रा. निलेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या आयोजनाकरिता विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक, युवक हे समाज परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम आहेत. त्यांनी जर नशा मुक्त भारताचा संदेश प्रभावीपणे समाजात पोहोचवला, तर भारत निश्चितच व्यसनमुक्त देश होईल.
**– डॉ. डी. व्हि. हांडे,**
प्राचार्य महात्मा फुले महाविद्यालय,वरुड.

# जुना धामणगावचा विकास अंधारात का?

युवक नेते ऋषी जगताप यांचा संतप्त सवाल

## ठेकेदारशाहीमुळे सामान्य जनता त्रस्त

**सलील काळे**
**धामणगाव रेल्वे, ( दि.14 )**–धामणगाव रेल्वेतील जुना धामणगाव परिसराचा विकास अनेक वर्षांपासून उपेक्षित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आणि ग्रामपंचायत सदस्य ऋषी जगताप यांनी प्रशासन तसेच सत्ताधाऱ्यांवर कठोर टीका करत तीव्र संताप व्यक्त केला आहे.



'आजपर्यंत या भागात जे काही दर्जेदार व जनहिताचे काम झाले, ते फक्त माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या कार्यकाळातच झाले. सध्याचे आमदार सत्तेत असूनही या भागाकडे दुर्लक्ष करीत आहेत,' असे स्पष्ट शब्दांत सांगत ऋषी जगताप यांनी विद्यमान नेतृत्वाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## निधीचा अभाव

गेल्या साडेचार वर्षांत जिल्हा परिषद निवडणुका न झाल्यामुळे निधीअभावी अनेक विकास योजना रखडल्या आहेत. याचा फटका थेट जुना धामणगाव आणि त्यातील वसाहतींना बसत आहे.

## खासदार अमर काळे यांचे आश्वासन

खासदार अमर काळे यांनीही जुना धामणगावसाठी निधी उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिले असून, त्यामुळे विकासाला गती मिळेल अशी आशा निर्माण झाली आहे.

## निव्वळ घोषणा नव्हे, कृतीस प्राधान्य

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे ऋषी जगताप यांनी ठामपणे सांगितले.

## ठेकेदारांचे हित, जनतेचे दुर्लक्ष

विकासकामांच्या नावाखाली सध्या सुरू असलेली कामे निकृष्ट दर्जाची आणि अपूर्ण असल्याचा आरोप करत जगताप म्हणाले की, ही कामे नागरिकांच्या गरजांऐवजी ठेकेदारांच्या हितासाठी केली जात आहेत. त्यामुळे रस्ते खराब, नाले चोक, आणि कचरा व्यवस्थापन ढासळले आहे. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रासदायक बनले आहे.

## लेआउट वाढले पण सुविधा नाहीत

नवीन वसाहती मोठ्या प्रमाणात तयार झाल्या, पण पायाभूत सुविधा दिल्याच नाहीत. मागील नियोजन कमी पडल्याने नागरिकांना आज अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे जगताप म्हणाले. जगताप यांनी स्पष्ट केले की,गेल्या चार वर्षांत आम्ही रस्ते, नाल्यांची साफसफाई व कचरा व्यवस्थापनावर भर दिला. पुढेही विकासासाठी कटिबद्ध आहोत

# हटकल्याने महिलेची गावगुंडाकडून हत्या

### गर्भवतीसह तिघे गंभीर जखमी

### बडनेरामध्ये थरारक घटना



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – शहरातील बडनेरा परिसरात सोमवारी रात्री किरकोळ वादातून एका गावगुंडाने एका कुटुंबावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात निलोफर बेगम शेख जमील (वय 32) नामक महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर एका गर्भवतीसह तिघे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

ही घटना इंदिरानगर आदिवासी वसाहतीत रात्री घडली. गुड्डू शहा नावाचा युवक परिसरातील लहान मुलांना चाकू दाखवत धमकावत होता. हे दृश्य पाहून निलोफर बेगम यांनी त्यास जाब विचारला. त्यावरून संतापलेल्या गुड्डूने आपल्या भावासह आई आणि एका अज्ञात तरुणास घेऊन शेख कुटुंबावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या क्रूर हल्ल्यात निलोफर यांचा मृत्यू झाला, तर



शेख सलीम (36), सनम मिर्झा अफसर बेग (16) आणि सलमा चौधरी अजहर चौधरी (28) हे गंभीर जखमी झाले. जखमींवर प्रथम इर्विन रुग्णालयात उपचार करण्यात आले, मात्र स्थिती गंभीर असल्याने त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले.

### चौघांविरोधात गुन्हा दाखल

दरम्यान, आरोपी हल्ल्यानंतर फरार झाले असून, पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली आहे. मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात ठेवण्यात आला आहे. याच दिवशी शहरात दुसऱ्या ठिकाणीही खूनाची घटना घडल्याने शहरात भीतीचे वातावरण आहे. अमरावती पुन्हा गुन्हेगारीच्या छायेत गेल्याची चिंता नागरिक व्यक्त करत आहेत.

# बाहेर लग्नाची सजावट, आतमध्ये कोकटेल पार्टी

- एरिया-91 रेस्टो बारमध्ये पोलिसांची धडक कारवाई
- 100 हून अधिक युवक-युवती ताब्यात



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.14 )** – शहरातील शंकर नगर भागातील एरिया-91 रेस्टो बार मध्ये रविवारी रात्री 'फेक वेडिंग पार्टी' च्या नावाखाली सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणावर मद्यपान आणि धिंगाण्यावर अमरावती पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत नशेत धुंद असलेले 100 हून अधिक युवक-युवती पोलिसांनी ताब्यात घेतले, यामध्ये अनेक अल्पवयीन मुला-मुलींचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे या पार्टीमध्ये शराबसोबत अंमली पदार्थही वापरण्यात आल्याची चर्चा आहे.

सामाजिक माध्यमांवरून 'फेक वेडिंग पार्टी' चे आयोजन करण्यात आले होते. सैम हेमंत बजाज (19), मानव पमनानी, श्लोक वैद्य आणि कृणाल पाल या युवकांनी दोन आठवड्यांपूर्वी इंस्टाग्रामवर या पार्टीसंदर्भात पोस्ट शेअर केली होती.

सुरुवातीला 400 रुपये एंट्री फी ठेवण्यात आली होती, परंतु प्रतिसाद वाढल्यामुळे ती 1,000 रुपयांपर्यंत वाढवण्यात आली. 16 ते 21 वयोगटातील अनेक युवक-युवती या पार्टीत सहभागी झाले होते.

या पार्टीसाठी शंकर नगरमधील एरिया-91 रेस्टो बार हे ठिकाण निवडण्यात आले होते. कारवाईदरम्यान पोलिसांना आढळले की, रेस्टो बारमध्ये कोणाचाही आधार तपासून न पाहता खुलेआम हार्ड ड्रिंक्स सर्व्ह केल्या जात होत्या, जे की कायदेशीरदृष्ट्या 25 वर्षाखालील व्यक्तींना देता येत नाहीत. त्या अल्पवयीन मुलांना देण्यात आल्याचे उघड झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या पार्टीत ड्रग्सचा वापरही करण्यात आला असण्याची शक्यता आहे आणि काही तरुण-तरुणी ड्रग्जच्या नशेत आढळले. ही कारवाई पहाटे 4 वाजेपर्यंत चालली यावेळी घटनास्थळी गर्दी झाली होती.

### बार सील होणार ?

या घटनेनंतर एरिया-91 रेस्टो बारला सील करण्याच्या हालचाली सुरू असून, पोलिसांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाशी पत्रव्यवहार सुरू केला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कलम 18, 77, 78, 82, पोक्सो ॲक्टचे कलम 78 आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार (मपोका) कलम 110, 112, 117 अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली असून, पालक वर्गामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून अशा बेकायदेशीर पार्टींवर भविष्यात आणखी कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# टेकडीवर खून, गटरमध्ये मृतदेह?

### 12 दिवसांनंतर विधी संघर्षित बालकाच्या कबुली जबाबातून उघड

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – शहराच्या फ्रेजरपुरा हद्दीत एसआरपीएफ कॅम्पजवळील टेकडीवर सुमारे दहा ते बारा दिवसांपूर्वी घडलेला युवकाच्या हत्येचा थरारक प्रकार अखेर उघडकीस आला आहे. गाडगेनगर पोलीस स्टेशनच्या डिटेक्शन ब्रँच (डीबी) पथकाच्या सतर्कतेमुळे हा गुन्हा उजेडात आला. संशयितरीत्या फिरत असलेल्या एका अल्पवयीन मुलाला थांबवून तपासणी केली असता, त्याने केलेल्या स्वीकाऱ्यातून पोलिसांना खुनाचा संपूर्ण तपशील समजला.

13 जुलै रोजी पहाटे 6.45 वाजता पलाश लाईन परिसरात गस्त घालणाऱ्या डीबी पथकाला एक बालक पोलिसांना पाहून पळताना दिसला. पोलीस नाईक राजेश गुरेले यांचा पाठलाग सुरू होताच बालक रोखला गेला आणि विश्वासात घेऊन विचारणा केली असता, त्याने धक्कादायक गुन्ह्याची कबुली दिली. त्याने सांगितले की, पुण्यातील त्याचा मित्र रिजवान मुलानी याचा तीन साथीदारांच्या मदतीने लोखंडी रॉड व पाईपने डोके फोडून खून केला आणि मृतदेह टेकडीवरील गटर चेंबरमध्ये फेकून दिला.



तांत्रिक पुरावा म्हणून पोलिसांनी बालकाचा मोबाईल तपासला असता, त्यात मृतदेहाचे छायाचित्र आढळले. यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने लगेचच फ्रेजरपुरा पोलिसांना माहिती दिली. संयुक्त पथक घटनास्थळी पोहोचले असता, वर्णनाप्रमाणे कुजलेला मृतदेह आढळून आला. पंचनामा करून पोलिसांनी घटनास्थळीच शवविच्छेदन केले; मृतदेहाच्या डोळ्यात व कानामध्ये कीडे पडलेले होते, ज्यामुळे मृत्यूला किमान 10 12दिवस उलटल्याचे स्पष्ट झाले.या प्रकरणात पकडलेल्या विधी संघर्षित बालकासह आणखी तीन आरोपींचा समावेश असून, चौकशीदरम्यान त्यांच्या नावांचीही माहिती मिळाली. चारही जणांविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कलम 302, 201, 34अन्वये खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. आरोपींना पकडण्यासाठी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली आहेत.

कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया व पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्राईम ब्रँचच्या निरीक्षक विजया पंधरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात डीबी प्रमुख भारत वानखडे, शिपाई गुलरेज खान, महेश शर्मा, नंदकिशोर करोची, रुपेश हटकर यांचा समावेश होता. पोलिसांच्या तातडीच्या हालचालींमुळे वर्षातील एका गंभीर हत्याकांडाचा छडा लागला असून, शहरवासीयांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले आहे.दरम्यान, बंदिस्त परिसरात या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमधील अस्वस्थता लक्षात घेता टेकडी परिसरात अतिरिक्त बंदोबस्त लावण्यात आला आहे. पुढील तपास सुरु असून उर्वरित आरोपी लवकरच जेरबंद होतील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती**– शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे.

# सिमेंटचे इलेक्ट्रिक पोल घेऊन जाताना ट्रॅक्टर पलटी

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ( दि. 14 )** – मोर्शी तालुक्यातील आष्टगाव येथून बेलोरा गावाकडे सिमेंटचे इलेक्ट्रिक पोल घेऊन जाणारा ट्रॅक्टर अचानक पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात अनिकेत सुनील मुंदाफळे (वय 26, रा. आष्टगाव) या युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून, चार मजूर गंभीर जखमी झाले आहेत.ही दुर्घटना सोमवारी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास मोर्शीड्ढचांदूरबाजार रस्त्यावरील वरला फाट्यानजीक घडली. महिंद्रा ट्रॅक्टर (क्र. रू॥ 27 ष्ठरु0472) वर सिमेंटचे पोल लादून बेलोरा गावाकडे मजुरांसह हा ट्रॅक्टर जात होता. मात्र ट्रॅक्टरवर अति भार असतानाच वळण घेताना तोल जाऊन ट्रॅक्टर पलटी झाला.या दुर्घटनेत अनिकेत मुंदाफळे याचा जागीच मृत्यू झाला. तर सचिन लोखंडे (29), रोशन धारवाडे (27), रोशन कासदेकर (22), अनिल जानवंशी (32) हे गंभीर जखमी झाले असून, दीपक भोकरे (23) याला किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर आष्टगावचे सरपंच दर्शन माल्हा व बंडू साउथ यांनी तातडीने मदत करत खासगी वाहनातून जखमींना उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे दाखल केले. मात्र चार जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे हलवण्यात आले.

# मोर्शीत गोवंशांची अवैध तस्करी उघड; 9 जनावरांचा मृत्यू

### ट्रकसह दोन आरोपींना अटक, 30 लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.14 )** –मोर्शी-चांदूरबाजार मार्गावरील वरला फाट्यानजिक 14 जुलै दुपारी 2 वाजता झालेल्या कारवाईत 43 गोवंश जनावरांची अवैध तस्करी उघडकीस आली आहे. मोर्शी पोलीस व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ट्रकचा पाठलाग करून तो थांबवत आत कोंबलेल्या जनावरांची सुटका केली. ही कारवाई अत्यंत धक्कादायक ठरली कारण ट्रकमधील 9 जनावरांचा निर्दयपणे कोंबल्यामुळे मृत्यू झाला होता. एम.एच.40 सीटी 4811 क्रमांकाच्या आयशर



ट्रकमध्ये 43 गोवंशातील गायी, कालवडी, गोऱ्हे यांना कोंबून नेले जात होते. ट्रकमध्ये तनसाचे पोते मागच्या बाजूला ठेवून मधोमध पार्टिशन करून ही वाहतूक सुरू होती. जनावरांची स्थिती अत्यंत भीषण व हृदयद्रावक होती. ट्रक थांबवून जनावरांची सुटका करताना 9 गोवंश मृतावस्थेत आढळून आले. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींनी आपली नावे सिद्दिकी रईस खान व इसुफ कुरेशी आरिफ कुरेशी (रा. मध्यप्रदेश) अशी सांगितली. प्राथमिक तपासात हे आरोपी मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात गोवंशांची अवैध तस्करी करत असल्याचे समोर आले आहे. उर्वरित जिवंत जनावरे केकतपूर येथील गौरक्षण केंद्रात चारा-पाण्यासाठी हलवण्यात आली. याशिवाय पोलिसांनी सुमारे 30 ते 32 लाख रुपये किमतीचा मुद्देमाल, म्हणजे ट्रक व गोवंश जप्त केला आहे.

### गोरक्षक संतप्त

महाराष्ट्रात गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा लागू असतानाही अशी बिनधास्त तस्करी सुरू असल्यावर गोरक्षकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी या प्रकारांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलावीत व संपूर्ण देशभर कठोर कायदा लागू करावा, अशी मागणी केली आहे. सदर कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत पो.उपनिरीक्षक आकाश शिवणकर, तुषार चव्हाण, पोलिस हवालदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे आदींनी सहभाग घेतला.

# सुंदरानीच्या मारेकऱ्यांना राजस्थानातून अटक

### गुन्हे शाखा युनिट एकची धडक कारवाई





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )**– रहाटगाव येथील एका बारसमोर किरकोळ वादातून झालेल्या हत्येप्रकरणी गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने राजस्थानमधील कोटा येथून आरोंपींना अटक केली आहे. शनिवारी रात्री ही हत्या घडली होती, तर रविवारी उशिरा दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार, अमरावतीतील रामपुरी कॅम्प येथील रहिवासी शिवा फुलवानी (वय 42) आणि विलासनगर येथील बंटी पवार (वय 30) हे दोघे राजकुमार सुंदरानीचे मित्र होते. शनिवारी त्यांनी राजकुमारच्या घरी जाऊन त्याला घेऊन बाहेर पडले. रहाटगाव येथील एस.ए. इम्पीरियल बारमध्ये त्यांनी जेवण आणि मद्यपान केले. या ठिकाणी रामपुरी कॅम्पमधील रवी तेजानी आणि अजय मेतानी हे देखील त्यांच्या सोबत सहभागी झाले होते. त्यानंतर राजकुमार आणि शिवा यांच्यात वाद झाला आणि राजकुमारची चाकूने हत्या करण्यात आली. घटनेनंतर दोघे आरोपी मोटारसायकलवरून फरार झाले. या प्रकरणी मृत राजकुमारचा भाऊ प्रकाश सुंदरानी यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला होता. मात्र आरोपींचा ठावठिकाणा लागत नव्हता. दरम्यान, गुन्हे शाखा युनिट एकच्या पोलिसांचे पथक कोटाकडे रवाना झाले. रविवारी रात्री उशिरा कोटा येथे सापडलेल्या बंटी पवार आणि शिवा फुलवानी या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या आरोपींना मंगळवारी अमरावतीला आणण्यात येणार आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.


# ग्रामपंचायत कार्यालय बैलमारखेडा
# पंचायत समिती भातकुली, जि.अमरावती

### निविदा सूचना

ग्रामपंचायत कार्यालय बैलमारखेडा, पंचायत समिती भातकुली, जि.अमरावती यांच्या मार्फत 15 दव्या वित्त आयोग योजनेअंतर्गत ,खालील कामाची निविदा ब-1 वर्गवारीप्रमाणे बांधकाम विभाग जि.प. अमरावती यांच्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे, कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय बैलमारखेडा यांच्याकडून देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखा शिर्षक | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | निविदा स्विकृत करण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | बयाना रक्कम 1 टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कॉंक्रीट नाली बांधकाम | 15 वा वित्त आयोग | 191239 | 500 रुपये | 15/07/2025 ते 22/07/2025 कार्यालयीन वेळेत | 15/07/2025 ते 22/07/2025 | 23/07/2025 | 1912/- |

**अटी व शर्ती**

1.दर कामाकरिता दिलेल्या मुदतीतच काम करावे लागेल.
2.कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
3.संबधीत शाखा अभियंता यांनी केलेल्या कामाचे मुल्यांकन केल्यानंतर देयके अदा केले जाईल.
4.सदर जाहीरात बदल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत बैलमारखेडा,**
**ता.भातकुली, जि.अमरावती.**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 9 प्रलंबित मागण्यांवरून सरकारला इशारा

## सरकारी कर्मचारी सप्टेंबरमध्ये राज्यव्यापी आंदोलनाच्या तयारीत

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.14 )** – 2025 हे वर्ष महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत असताना, केंद्र सरकारकडून आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी मिळाल्यामुळे एक वेगळाच आशावाद निर्माण झाला आहे. त्यानुसार 1 जानेवारी 2026 पासून आठवा वेतन आयोग लागू होण्याची शक्यता आहे. मात्र, राज्यातील कर्मचाऱ्यांच्या अनेक महत्त्वाच्या मागण्या अद्यापही प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी या मागण्यांच्या अनुषंगाने सरकारकडे निवेदनाद्वारे मागण्या सादर केल्या असून, जर लवकरात लवकर यावर निर्णय घेण्यात आला नाही, तर येत्या सप्टेंबर महिन्यात राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा देण्यात आला आहे. यामुळे शासनावर दबाव वाढण्याची शक्यता असून, कर्मचाऱ्यांचा रोष अधिक तीव्र होत चालला आहे.

संघटनांनी केलेल्या निवेदनात महागाई भत्त्यात वाढ, सेवानिवृत्तीचे वय वाढवणे, नवीन कामगार संहिता रद्द करणे, शिक्षकांच्या संचमान्यतेचा आदेश मागे घेणे, पदभरतीवरील बंदी उठवणे, अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना नियुक्ती देणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करणे, नवीन राष्ट्रीय धोरणावर पुनर्विचार करणे व सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजनेचा आदेश काढणे या मुद्द्यांचा समावेश आहे.

या सर्व मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत आणि वारंवार पाठपुरावा करूनही निर्णय होत नसल्याने आता कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सप्टेंबरमध्ये आंदोलन उभारण्यासाठी सर्व संघटनांनी एकजूट दाखवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे राज्य सरकारसमोर आव्हान उभे राहिले असून, कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देणे आता अपरिहार्य बनले आहे.

# चिखलदरा, अंजनगाव तालुक्याच्या जि.प. ,पं. स.च्या प्रारूप प्रभाग रचना घोषीत

- 21 जुलैपर्यंत आक्षेप नोंदवण्याची अंतिम मुदत
- काही गटांमध्ये थोडेफार बदल; राजकीय हालचालींना वेग






**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.14 )**– पंचायत राज व्यवस्थेतील महत्वाचे घटक म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समिती. याच माध्यमातून ग्रामीण भागात लोकप्रतिनिधी निवडले जातात आणि राजकारणाची पायाभरणी होते. चिखलदरा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली असून यामध्ये जिल्हा परिषदेचे 4 गट व पंचायत समितीचे 8 गण निश्चित करण्यात आले आहेत.

चिखलदरा तहसील कार्यालयात तहसीलदार जीवन मोरणकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार अक्षय मांडवे यांनी ही रचना जाहीर केली. जिल्हा परिषदेचे चार गट – चुरणी, काटकुंभ, जामली आर आणि टेंब्रुसोंडा असे निश्चित करण्यात आले असून पंचायत समितीचे आठ गण ङ्क हतरु, चुरणी, काटकुंभ, सलोना, कुलंगणा खुर्द, जामली आर, वस्तापूर आणि टेंब्रुसोंडा असे निश्चित झाले आहेत.

### सोमवारखेडा ग्रामपंचायतीचे पुनर्विनियोजन

या प्रारूप प्रभाग रचनेत सोमवारखेडा ग्रामपंचायतीचा उल्लेखनीय बदल झाला आहे. यापूर्वी सोमवारखेडा ही टेंब्रुसोंडा गटात होती, मात्र आता ती जामली आर गटात समाविष्ट करण्यात आली आहे. यामागे लोकसंख्या प्रमाण आणि काही गावांचे पुनर्वसन कारणीभूत असल्याचे नायब तहसीलदार मांडवे यांनी सांगितले. या रचनेवर कोणीही आक्षेप नोंदवू इच्छित असल्यास त्यांनी 21 जुलै 2025 पर्यंत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### अंजनगाव तालुक्यात 3 जिल्हा परिषद गट व 6 पंचायत समिती गण निश्चित

**अंजनगाव सुर्जी**–जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी 2011 च्या जनगणनेनुसार अंजनगाव तालुक्यात प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. यात जिल्हा परिषदेचे 3 गट – कापुसतळणी, भंडारज व सातेगाव निश्चित झाले असून पंचायत समितीचे 6 गण ङ्क पांढरी, कापुसतळणी, चौसाळा, भंडारज, सातेगाव व कोकर्डा असे तयार करण्यात आले आहेत.

### प्रत्येक गणात खालीलप्रमाणे गावांचा समावेश करण्यात आला आहे

**पांढरी गण** – पांढरी, खोडगाव, बोराळा, शेलगाव, टाकरखेडा मोरे, धनेगाव
**कापुसतळणी गण** – कापुसतळणी, पोही, चिंचोली शिंगणे, जवळा, कसबेगव्हाण, साखरी
**चौसाळा गण** – चौसाळा, निमखेड बाजार, हिरापूर, खिराळा, लखाड, तुरखेड, दहिगाव
**भंडारज गण** – भंडारज, मलकापूर, अडगाव खाडे, हसनापूर पार्डी, गावांडगाव, हिंगणी, कारला, जवर्डी, कळगव्हाण
**सातेगाव गण** – सातेगाव, हंतोडा, विहिगाव, मुऱ्हा, वरुड खुर्द, चिंचिली बु, चिंचोली खुर्द
**कोकर्डा गण** – कोकर्डा, सोनगाव, खिरगव्हाण, पिंपळगव्हाण, एकलारा, वानोजा, कुंभारगाव, निभारी, खासपूर, कोतेगाव, हयापूर, लखनवाडी, घोडसगाव, कमालपूर तरोडा

# नगर पंचायतकडून माहिती अधिकाराचे उल्लंघन

## नागरिकांमध्ये संतापाची लाट




**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, ( दि.14 )**–नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत कार्यालयात माहिती अधिकार कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. माहिती मागवणाऱ्या नागरिकांना संपूर्ण आणि स्पष्ट माहिती देण्याऐवजी अर्धवट, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली जात असल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केला आहे.

नगर पंचायतचे पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता अभिजित लोखंडे हे बांधकाम विभागाचे जनमाहिती अधिकारी आहेत. त्यांच्याकडे एका विकासकामाची माहिती लेखी स्वरूपात मागवण्यात आली होती. मात्र त्यांनी दिलेली माहिती ही विस्कळीत आणि अपूर्ण असून, ती मुद्दाम विषय चुकवण्यासाठी दिल्याचा आरोप झाला आहे. या प्रकारानंतर संबंधित नागरिकाने मुख्याधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. मुख्याधिकारी यांनी स्पष्ट आदेश देऊन माहिती सादर करण्यास सांगितले असतानाही लोखंडे यांनी पुन्हा माहिती नाकारून प्रशासकीय आदेशालाच हरताळ फासल्याचे दिसून आले आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला असून, अनेकांनी आरोप केला आहे की अभिजित लोखंडे हे सातत्याने माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करत आहेत. नागरिकांना अर्धवट माहिती देऊन वारंवार फेऱ्या मारायला लावणे, त्यांना कंटाळवून माहिती मागण्यापासून परावृत्त करणे, ही त्यांची पद्धत बनली आहे. प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी आणि माहिती अधिकार कायद्यानुसार वेळेत, पारदर्शक माहिती देण्याचे पालन सुनिश्चित करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संबंधित व्यक्तीचा माहितीच्या अधिकारात अर्ज प्राप्त झालेला होता.त्यांनी मागितलेल्या विषयावर परिपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे.
**–अभिजित लोखंडे,**
अभियंता, स्वच्छता व
पाणीपुरवठा विभाग
न.पं.नांदगाव खंडेश्वर

# शेतीउत्पादन, विक्री व विपणन अशा सर्वच बाबींवर काम करण्याची गरज

## कृषी विकासाच्या धोरणात आ. संजय खोडके यांची मागणी




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती/मुंबई( दि.14 )**–राज्य शासनाने पुढील पाच वर्षांसाठी कृषी विकासासाठी 25 हजार कोटी रुपयांचा आराखडा जाहीर केला आहे. यामध्ये अमरावती विभागातील शेतीच्या सर्वांगीण विकासावर भर देणे अत्यावश्यक असल्याचे मत आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेतील चर्चेत मांडले. त्यांनी कापूस, सोयाबीन, तूर व संत्रा यांसारख्या प्रमुख पिकांच्या लागवड, उत्पादन, व्यवस्थापन व विक्री यांसाठी प्रभावी धोरण आखण्याची गरज स्पष्ट केली.

आ. खोडके यांनी जुना अनुभव व योजनांचा अभ्यास पुढे नेण्याची शिफारस केली. टी अँड व्ही योजना, सॉल्वेंट प्लांट्स, कॉटन फेडरेशन अशा योजना कालांतराने बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे जुन्या योजनांना नव्याने बळ देत त्यांचा नव्या आराखड्यात समावेश करणे गरजेचे आहे.

त्यांनी सांगितले की, सध्याचे कृषी अधिकारी, सहाय्यक अधिकारी व पर्यवेक्षक यांचे संघटनात्मक कार्य बळकट करून अंमलबजावणी सुसूत्र करणे आवश्यक आहे. संत्रा पिकांवरील रोगप्रादुर्भाव, कीड व्यवस्थापन आणि संशोधन केंद्र स्थापनेचीही त्यांनी मागणी केली. अमरावतीमधील पीक संशोधन उपकेंद्रात योग्य तज्ञांची नेमणूक केल्यास संत्रा उत्पादनात सुधारणा शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दरवाढीमुळे शेती व कृषी उद्योगांवर मोठा परिणाम होत असून, त्याचा विपरित परिणाम राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो, याकडेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. शेवटी, नवीन कृषी धोरणात जुन्या योजनांचा समावेश, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आणि कार्यक्षम अंमलबजावणीद्वारे राज्यातील कृषी क्षेत्राला नवी दिशा व भरभराट मिळेल, असा विश्वास आमदार संजय खोडके यांनी व्यक्त केला.

# महानगरपालिका शाळांना 'हाऊसफुल'चा मान!




## पालकांचा वाढता कल; पटसंख्येत लक्षणीय वाढ

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि.14 )**– शहरातील महानगरपालिका शाळा या दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत असून, यंदा अनेक शाळांमध्ये 'हाऊसफुल'चे बोर्ड झळकताना दिसत आहेत. मागील काही वर्षांत महानगरपालिका शाळांची पटसंख्या सातत्याने वाढत असल्याचे चित्र असून, यावर्षी ही संख्या 11 हजार 962 वर पोहोचली आहे. मागील वर्षी ती 11 हजार 500 इतकी होती. दिवसेंदिवस पालकांचा वाढता कल, पटसंख्येत लक्षणीय वाढ होत असून आता महानगरपालिका शाळा 'हिट' होत आहे.

महानगरपालिकेच्या मोफत पूर्व प्राथमिक शिक्षणामुळे गरीब व मध्यमवर्गीय पालकांची शिक्षणावरील आर्थिक झीज कमी झाली आहे. याचा थेट फायदा शाळांच्या पटसंख्येला झाला आहे. यंदा 2,730 विद्यार्थी पूर्व प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

वडाळी, विलासनगर, भाजीबाजार, नागपूरी गेट, मुजफ्फरपुरा, जमील कॉलनी, नुर नगर, लालखडी, बडनेरा, बेनोडा, तालाबपुरा, वडरपूरा येथील मराठी, हिंदी व उर्दू माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.

खाजगी शाळांमध्ये प्रवेशासाठी मोर्चेबांधणी करताना दिसते, तिथे महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी वाढल्यामुळे म ु ख् य ा ध् य ा प क ा ं न ा %हाऊसफुल%चे फलक लावावे लागत आहेत. हे चित्र महापालिकेच्या शिक्षण विभागासाठी निश्चितच कौतुकास्पद आहे.

उत्तम शिक्षण, मोफत सेवा, शाळांचा विकास आणि शिक्षकांचे योगदान यामुळे पालकांचा विश्वास महानगरपालिका शाळांवर वाढत आहे. हे यश शिक्षण क्षेत्रात पालिकेच्या सकारात्मक वाटचालीचे प्रतीक ठरत आहे.

महापालिका शिक्षण विभागाच्या नियोजनबद्ध धोरणांमुळे, उत्तम शिक्षकवृंद, आवश्यक सुविधा आणि विद्यार्थ्यांवरील व्यक्तिगत लक्ष यामुळे शाळांचा दर्जा उंचावला आहे. याचा थेट परिणाम म्हणजे पालकांचा विश्वास पुन्हा सरकारी शाळांकडे वळत आहे. शिक्षण क्षेत्रात महापालिकेचा हा सकारात्मक बदल निश्चितच अभिमानास्पद असून, दर्जेदार शिक्षण हे फक्त खाजगी शाळांचं मक्तेदारी नसून सर्वांसाठी उपलब्ध असू शकतं, हे या वाढीव पटसंख्येने सिद्ध केलं आहे.

# निर्लेखित वस्तूंचा लिलाव

**अमरावती**– जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्लेखित करण्यात आलेले फर्निचर, लाकडी लोखंडी खुर्चीचा लिलाव करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी दि. 18 जुलै पर्यंत निविदा सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जुन्या निर्लेखित शासकीय कालबाह्य झालेल्या विविध प्रकारच्या 237 खुर्च्या जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. सदर साहित्य आहे त्या स्थितीमध्ये विक्री करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती जिल्हा प्रशासनाच्या amravati.nic.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. दरपत्रक सादर करण्याचा कालवधी पासून पर्यंत दि. 9 जुलै 2025 सकाळी 10 वाजेपासून ते दि. 17 जुलै 2025 दुपारी 5 वाजेपर्यंत आहे. यासाठी सपंर्क अधिकारी अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती संपर्क क्रमांक 0721-2662493 आहे. दरपत्रक उघडण्याचा दि. 18 जुलै 2025 सकाळी 11 वाजता राहील. दरपत्रक अधिक्षक यांचे कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उघडण्यात येईल.

# विद्यमान आमदाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसची पोलिस स्टेशनवर धडक



## वरूडमध्ये विकासकामे रद्द केल्याच्या आरोप

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.14 )**– भाजपच्या कार्यकर्त्यांनी माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्याविरुद्ध वरूड पोलीस स्टेशनमध्ये खोट्या तक्रारी दाखल केल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी वरूड पोलीस स्टेशनवर धडक दिली. या कृतीमुळे मतदारसंघात असंतोष पसरू शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास जबाबदार कोण असतील, हे स्पष्ट करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

मोर्शी विधानसभा मतदारसंघातील वरूड, मोर्शी, शेघाट नगर परिषद क्षेत्रातील कोट्यवधी रुपयांची विकासकामे रद्द केल्याचा आरोप माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी केला होता. त्यानंतर 29 जून रोजी आमदार उमेश (चंदू) यावलकर यांनी पत्रकार परिषद घेऊन भुयार यांच्यावर बिनबुडाचे आरोप केल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. विकासकामांमध्ये रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा यांसारख्या सुविधा होत्या. या कामांमुळे अनेक वर्षांची मागणी पूर्ण होणार होती. मात्र कामे रद्द झाल्यामुळे जनतेत संभ्रम आणि नाराजीचे वातावरण आहे. या प्रसंगी उपस्थित नेत्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तारेश देशमुख, वरूड तालुकाध्यक्ष विजय वडस्कर, युवक अध्यक्ष निलेश गोमकाळे, सागर आलोडे, दिगंबर निकम, निखिल बनसोड, कुशल अंबाडकर, रेखा रामटेके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता. जनतेच्या हिताच्या कामांवर राजकारण करून नुकसान केल्यास, जनता योग्य वेळी उत्तर देईल, असे ठाम मत यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने व्यक्त केले.

### एकमेकांविरुध्द पत्रकार परिषद

माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी 23 जून रोजी वरूड विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेऊन, सन 2023–24 मध्ये त्यांनी शासनाकडून मंजूर करून आणलेल्या 15 कोटी रुपयांच्या विकासकामांना विद्यमान आमदार उमेश यावलकर यांनी पत्र पाठवून रद्द केल्याचा आरोप केला. त्यामुळे नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांवर परिणाम झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

### महायुतीमध्ये वितंडवाद

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका तोंडावर असताना वरुड–मोर्शी विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये वितंडवाद निर्माण झाला आहे. त्यामूळे याचा फायदा विरोधकांना होईल यात दुमत नसावे.


## सार्वजनिक सूचना

**माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे, की खरेदी खताची मूळ प्रत सुरेश चंद्रभान पचारे विक्रेता म्हणून आणि प्रकाश पुंडलिकराव लवंगे खरेदीदार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हे खरेदीखत सह दु.नि. अमरावती शहर 1 च्या सब रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणीकृत असलेले अनुक्रमे नोंदणी क्रमांक 1540 दिनांक 30/03/2016 असुन सदर खरेदी खताची ची मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन 07 ( सात ) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

शिक्का

स्वाक्षरी
ॲड. प्रविण भुस्कडे
सांगेकर नगर भक्तिधाम रोड
चांदूरबाजार
जिल्हा अमरावती.
मो. क्रमांक 8788355988

